म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ४७१
१९०५
REFBK-0000278
REFBK-0000278

# अर्पणपत्रिका.

श्रीयुत रा. ब.

## बाबूराव भालचंद्र ॐकार,

फ. क्ला. ऑनररी माजिस्ट्रेट, म्यूनिसिपल कौन्सिलर,
मेंबर लोकल डिस्ट्रिक्ट बोर्ड, कन्सिलियेटर,
व्हाइस प्रेसिडेंट तालुका लोकल बोर्ड,
हवेली, पुणें, इत्यादि, इत्यादि.

## यांस

ही अल्प कृति त्यांची रसिकता, औदार्य, गुण-
ग्राहीपणा, वगैरे गुणांस लुब्ध होऊन
कर्त्यानें मोठ्या विनम्रपणें

**अर्पण केली असे.**

ग्रंथकर्त्ता.

श्रीबाळकृष्णमहाराज प्रसन्न.

# नोकरीचा राजीनामा.

## [ कटाव. ]

वेष नाटकी सोंग घेतलें, इजार मौजे शेरवानि ती, अंगीं साजे, मनसबदारी, पगडि घालितां, मन बहु लाजे, उपाय नाहीं यवनिय राजे, ऐशा वेषें, अतितर तोषें, कदम आहेस्ता, या जयघोषें, भालदार छडिदार पुकारित, असतां आह्मीं, कमर बांधुनी, हात जोडुनी, ब्राह्मणरीती सारी सोडुनि, सरळ ति अपुली मान मोडुनी, सुशील तरुणी, नम्रपणानें, संकोचित त्या शांत मनानें, पायांकड जशि पाहत चालते, मंदगतीनें, पूज्यमतीनें,—तैसें आह्मीं, नजर घेउनी, गजर ऐकतां, हजर जाहलों दरबारामधिं, तेथें किति तरि कदर सांगुं मी, अदर कशाचा, सदर कचेरी, ह्मणुनि अशेचा, घोंटाळा या, पोटाला या, जाळायास्तव, सलाम झाला, झुकोनि तिनदां, पोटाचा या, कठीण धंदा, स्वतंत्र असतां झालों बंदा, गुलामगिरीच्या दावुनि सनदा, सर्टिफिकट तें त्या खाविंदा, गुलामगिरिमधिं चतूर नामी, अतुर दर्शना जाहलों आह्मीं, लावा अह्मांस सेवा कामीं, पायधूळ मी, कीं दो इल्मी, बहुजुद कलमी, गोड गोड या मृदु शब्दांनीं, हळू ह्मणें घ्या विनंति कानीं, नाहिं आसरा दुसरा कोणी, खुदावंदा, या मतिमंदा, ऐसें नच मी अनंदकंदा, नम्रपणानें त्या गोविंदा, शरण जाहलों पदकमलाला, हर, हर, हर, हर! कशास आलों, नरजन्माला, जन्मतांच कां घात न झाला, ऐसें वाटे मम चित्ताला, परि उदरासाठीं, हांजी हांजी लागे पाठीं ॥ १ ॥

तहासिलिं माजीं,झालि मुक्री,आप्तइष्ट हीं खुषींत सारीं,मंडाळि ह्मणती हुषार भारी, नौकर बनला लौकर जाहला, उदय ययाचा, अनंद झाला, ज्याचा होता, पदर लोभाचा, मामा ह्मणतो माझा भाचा, सिगेदार हा पेषि जबाबी, पेशकार तो लवकर होइल, उमीद नव्हती, नौकर होइल, कारण याचें कथितों मी आज, मुळापासुनी कंटाळा मज, ह्मणूनि केली टाळाटाळी, प्रसंग येतां वेळोवेळीं, परी कपाळीं नौकरि होती, त्यामाजीं मम कायआहुती, वाटें ऐसें मजला निशीदिनिं,पांच वर्ष मी, हर्ष सोडुनी, उत्कर्षाची इच्छा न मनीं, किंचित् धरली, हाव न भरली, आशा नुरली, हौसहि पुरली, पुढची इच्छा मागें सरली, सहज वृत्तिनें, कालगतीनें, काय होत तें, सर्वहि पाहणें, ऐसें चिंतुनि रजा रुकसती, बहुत घेतल्या,तनखा आपुल्या फार घातल्या,श्रीसाधूच्या प्रसादकृतीनें,नाद मला अति ज्योतिष्याचा, बहु दिवसांचा, त्या शास्त्राचा, अधार साचा, मानुनि निश्चय, करीं मनाचा,तसा पदोपदिं वागुं लागलों,लोकांनाही सांगुं लागलों,त्यामाजीं मी निमग्न झालों,अचार तोची,चोचौघांमाधिं,विचार तोची,व्हावा वाटे प्रचार तोची,गृहीं गृहीं ग्रहपूजा व्हावी, पूज्यबुद्धि सर्वांचि असावी, या शास्त्रावर ध्यास हाच अति, दुसरिकडे नच चाले मन्माति, अठराशे एकोणीसाला, ग्रहयज्ञाला अरंभ केला, सुटी साधुनी, पर्व शोधुनी, करूं लागलों, प्रतिमासाला, ग्रहमखाला, नियमानें मख, दोन वर्ष पर्यंत जाहला, शके अठरासे एकविसाला, संक्रातीची अली पर्वणी, सहस्ररश्मी मकरीं ज्या दिनिं, वाटे अतितर तोष मम मनीं, मखतय्यारी साग्र करोनी, पूर्व दीवशीं अस्ता वेळां, अधिकाऱ्याच्या जाउनि जवळीं, कचेरि नाहीं उद्यां मोकळी, ह्मणोनि मजहवि कार्य करोनी, आर्यधर्म तो, यथामतीनें, रक्षण करणें, कर्तव्यांतिल जाणुनि येणें, उद्यां कचेरिंत नच होईल हो,या अर्जाचें स्मरणाचि राहो, ऐसें प्रार्थुनि, आलों सदनीं, निमंत्रिले मग ब्राह्मण जाउनि, सर्व तयारी, घरीं जाहली, शांतपणानें झोंप लागली, रजनी सारी सहजचि गेली, अरुणोदय होतांच वाजली, कवाडावरी थाप थोरली, त्यायोगें मम निद्रा हरली, "चलो" ह्मणे "सरकार

बुलाये, कारजरूरी कचेरि आये, नींदभि वय सब रात न पाये, जरा नहीं शब खाना खाये, " ऐसें वदला तो चपराशी, भासें आला शनि मम राशीं, विघ्न कराया या कार्यासीं, उल्हासवृत्तिला, अंतर आला, शूळ जाहला, मूळ पाहतां, चूळ भरोनी, तयाबरोबर तुळतुळ करुनी, झालों जातां, शूळ दाविती जसे अनाथा, तैसी गति मम- झाली तेव्हां, गृहसख अजिचा कैसा व्हावा, ऐसें वाटे माझे जीवा, परि लग लग गेलों त्या भेटी, या पोटासाठीं, हांजी हांजी लागे पाठीं॥२॥

पोंचतांच मी सलाम केला, शंभर कदम दूर राहुनी, यजमानाला, लाग झणे तो झट कामाला, कथिलें ऐसें क्रूराज्ञेनें, 'हांजी' झणूनी मी मानेनें, हलवुनि नंदीबैलाप्रमाणें, कबूल केलें बहु सन्मानें, माझ्या वांचुनि काम न चाले, कचेरिंतिल कीं पान न हाले, गर्वोक्तीनें वाणी बोले, अंदरकी तो रामहि जाणे, बाहिर पोकळ मारि तनाने, पळो- पळीं तो राग वाढला, आग लागली जणुं शरिराला, दिनकर वर जों येऊं लागला, तळमळ वाटूं लागे मनाला, दाहाचा तो घंटा पडला- दाह जाहला, हा, हा, हा, हा, ऊष्ण श्वास तो, निघूं लागला, जाउ, नि वदलों यजमानाला, दोनचि घंटे मज द्या स्वामी, येतों अपुलें कार्य करूनी, नाहिं झणु नये या शुभकामीं, सर्व तयारी आहे धा- मीं, जीव जाइ तरि कांव न येईल, 'शिव, शिव, शिव, शिव!' म- नांत झणुनी, अपुल्या ठाईं व्यर्थ कण्हूनी, समोर येउनि, वर वर आपुलें, हास्यवदन तें बळें दावुनी, हात जोडुनी, दनिपणानीं, 'संभा- ळावी अमुची वाणी, दीनदयाळू, पूर्णकृपाळू आपण आमचे माय बाप कीं धनी वसीले,' ऐशा किति तरि विशेषणांनीं, जोडुनि पाणी, करुणावाणी खर्च करूनी, अर्ज करीतां, " हर्ज काममे आब है आतां, मै नहीं सुनता, नालायक, बेवकुफ तुझे क्यां, नहि समजतां, खियाल रखना, फिर नाहिं पुछना, काम हुयेबिन घर नहि जाना, हकाल दोंगा, निकाल दोंगा, पांच मिनटमे फैसल होगा, खानेको फिर क्यां मिलेंगा?" ऐशा शब्दें, जरि मज दुखवी, तरि वाणी मम त्याला सुखवी, भजलों असतों, जरी अनंता, करुणा येती त्या भगवंता, अखिल हेतु तो, पूर्णचि करितां, एकनिष्ठ होउनि त्या स्मरतां, ऐशी ही चाकरि खोटी, परि उदरासाठीं, हांजी हांजी लागे पाठी ॥ ३ ॥

मम कुलगुरुंची आली स्वारी, ह्मणति 'चला घरिं सर्व तयारी, ब्राह्मण. मंडळि जमली सारी, काम राहुंद्या अज सरकारी, करूं नये हो किमपी देरी, बारानंतर कर्मकाल तो, धर्मशास्त्रमत नच हो राहतों,' विनंति करुनी, त्यांना कथिलें, ग्रहमख आजचें राहितचि केलें, तावेदारी मारि उपाशी, अनंत पापें दासदासीं, जन्मां येउनि भोगि उदासी, साह्य न होती कोणी त्यासी, जन्म आमुचा दुसऱ्यां हातीं, गर्धभ जैसे भार वाहती, खाण्यावांचुनि दिवसा रातीं, धन्य खरे त्यां, वाचा नसती, अह्मासि असुनी बोलुं न शकतों, अह्माहुनि पशु बरा मूक तो, अह्मीं सुखाला फुका हि मुकतों, व्यर्थ आपणा विकूनि घेतों, कर्तृत्वाची घमेंड आह्मां, विसरुनि जातां हरिच्या नामा, मनुज नीच जे त्या परमात्मा, ह्मणूनि आर्जव नवनव नित्यचि, हरिनामाचें धरूनि पथ्यचि, सोडुनि दिधलें मुळांत सत्यचि, त्याचा बदला आज भोगिला, अनुभव पूरा आला मजला, अनन्यभावें त्याला स्मरतों, तरी उपाशीं कधि नच मरतों, आपण जाउनि कीजे भोजन, मी कैदेंतून सुटून येईन, तेव्हां जेविन, असेल जेव्हां अन्न कपाळीं, मिळेल मजला त्याचि वेळीं, तुह्मीं फुका कां श्रमांत पडतां, मजसाठीं कां व्यर्थचि अडतां,' परि ते वदले, ' भोजन आपणांवांचुनि कोणी, करति नाहीं,' कथिलें त्यांनीं आग्रह पाहुनि भूदेवाचा, वदली ऐसी माझी वाचा, 'दूर करी जो फेरा अमुचा, त्या विष्णूला अनन्य भावें, कोण्याहि मिषें सदां भजावें, सत्यव्रतानें आज पुजावें, निशीमुखाला त्या ईशाला, शोभे ज्याला, पीत दुशाला, संकल्पाचि हा माझा झाला, मग गडबड ती हवी कशाला, शांती देइल तोचि जिवाला, वाली अमुचा बासरिवाला, पाळितसे जो गोपगवाला, पर्वश्रेष्ठ हा बरवा आला, पूजाविधिला, या साठीं तुह्मि गृहिं मम जावें, विप्रांसह उपहार करावे, प्रभूसि पूजुनि रात्रीं जेऊं, सर्व मिळुनी तोषा पावूं,' वदूनि त्यांना मी धामाला, पाठविलें मग निज कामाला, तयार झालों, फार कशाला, सार सांगतों, हुषार होउनि बहार आमुचा, त्या दिवशींच्या, नौकरीचा, त्या हौसेचा, संध्येचा तो समय पातला, काम सुचेना कांहीं मजला, जाउनि मग अधिकाऱ्यांपाशीं, वदलों कीं ' मीं असें उपासीं, कृपासिंधु तुह्मि

करुणारासी, द्यावि इजागत जाण्या घरासी, विनंति ऐका माझि जरासी,' दया नये, परि तया नरासी, निर्भिड होउनि पुन्हा मि वदलों, 'तुह्मांस विकलों, परंतु थकलों, आणी सुकलों, अन्ना मुकलों, प्रार्थनेंत मीं बराच बकलों, आज दिवसभर काम भराभर, यथाशक्ती मी जैसें कळलें तैसें केलें, जाग्यावरुनी पाय न ह्याले, दीर्घ प्रयासें वाचा बोले, यास्तव हा स्तव तव पायाशीं, करीतसें मीं, प्रभुजी सोडा, जेवायासी मजला धाडा,' ऐकुनि माझे शब्द क्षोभले, नेत्रद्वय ते रक्त जाह्ले, त्वेषामाजीं येउनि बोले, "बह्मन् दिनभर खाने मरते, काम कच्छेरी कुच्छ नहिं करते, नव बजनेको शबके जाना, तमाम शबभर खाना पीना, आजहि होना, जरूरि कागज फक्त रवाना, मुफ्त न खोना, वक्त आपना, सक्त करूंगा मै जुरमाना, गडबड करतां, बदबख्त दिवाना, टप्पा जातां दसबजे जाना, जबतक कागज तयार रखना, हिल नहिं सकना, फुजूल बकना, काम न आतां, भूकाप्यासा क्यूं नहिं मरता, हमे गरज नहिं, काम हारज नहिं, पलभर होता, मजहबि कामकि घमंड दिखाता, नौकरि क्यूं झकमारने करतां, भीक मांगते क्यूं नहिं फिरतां, भूकां कहके हमें डराता, क्यूं नहि मरता, (दुःखताप तो सर्वहि हर्त्ता, ईश्वर अमुचा रक्षणकर्ता, वदलों तेंव्हां मनांत मी हें,) उसकी हमको क्यां गमी है, बंदे जगमे क्या कमी है, नौकरि बह्मन् कोहि जमी है, सरकार कारकु हजार मिळते, गुलाम दिनभर सलाम करते, दाढी रखते, जनौ फेकते, मुछी मुंडते, चोटि उखाडे नौकरि धुंडते, देश छोडते, विदेश जाते, सब कुछ खाते, दिनभर कामके बोझे उठाते, मजबुत अच्छे, नहिं है कच्चे, खरके बच्चे, जरा न सच्चे, बह्मन् लुच्चे, इज्जत बढती इस्से सारी, हरको प्यारी, ताबेदारी पांच रुपयेकी नहि मिलती है, मजहबि बात कहां चलती है, बोलचालके यह गलती है, उजर दिखाना, हजर न रहना, मजहबि बहाना मेरे सामने कबि नहि लाना." ऐकुनि हे वच नच धिर उरला, हृदयामाजीं ईश मि स्मरला, लिहून दिधला राजीनामा, नमस्कारिलें कचेरी कामां, शपथ घेउनी होइं रिकामा, ईश भजत मी

आलों धामा, जन वदले हट्टी, या उदरासाठीं, हांजी हांजी
लागे पाठी ॥ ४ ॥

वृद्ध आमचे पेषकार ते, येउनि वदले काय सार तें, थोड्या मधिं
मीं सांगुनि देतों, बोध शहाण्या अधिक काय तो, चार शिष्टही इष्ट
आमुचे, हिताचिंतक ते त्यांसह होते, लावित होते, होला हो ते, विकाळ
काळ तो भयप्रदवेषें, फाराचि रोषें दुष्काळरूप तें धारण करुनी, धारण
तेजीमार्जी आणुनि, साधारण जन खाण्यावांचुनि, गेले मरुनी,
धोरण यास्तव जरा धरोनी, विचार करुनी काम करावें, फजित न
व्हावें, कळकळ वाटत जीवेंभावें, ह्मणुनि वाटते मला कथावें, मि-
जाजि मार्जी अतितर तेजी, ऐसी कांजी, बेगरजीनें, या समई तुह्मि
रोजी सोडुनी, राजीनामा दाजी देणें, लाजिरवाणें, आजि आपणां नाहिं
बरोबर, हांजी हांजिनें पोट खरोखर आजि भरावें, राजी राखुनी
अधिकारांवर असणाऱ्याला, मर्जित येतां ऊर्जित होईल, अर्जित मा-
फी लिहून यावें, वर्जित जाउनि काय करावें, नौकरिला त्या, कोठें जावें,
कोणा खावें, कैसें व्हावें, परिवाराचें, कसें भरावें, पोट वदावें, दाव्या-
नें कां अंवळुन रहावें, वेळ पाहुनी काम करावें, धनी विचारित नसे
चाकरा, मायबापही स्वकिय लेंकरा, दारुण दुःखें उदरासाठीं, लोक
भोगिती अतितर मोठीं, वेळां आली किततरि खोटी, मूल आसतां
जरि तें पोटीं, त्यासि टाकुनी सत्वर पाठीं, अकांत करितां घेतिं न
ताटीं, प्रियपत्नीला लावुनि वाटीं, मिळतां खाती स्वतःच रोटीं,
ज्याचें त्याचें पोट खपाटी, तरुणही असतां दिसतो साठीं, ऐशी
स्थिति अति दीनपणाची, कमाल झाली क्षीणपणाची, अमल्दारि
जरि लीनपणाची, तूर्त आसतां कोणि कुणाची, परवा करिना, बरवा
ह्मणना, सर्वां संकट बिकटचि जाणा, निकट पोंचलें, ह्मणूनि बोल-
ति तिखट आसले, नरडिस आला प्राण ह्मणूनी, चिरडिस येती, पर-
डिस हातीं, घेतां कोणा प्राणा रक्षण करण्या दाणा, कोठें दिसेना,
मोठेपणाही कुठें वसेना, कठिण कठिण हा काल बाल तुह्मी, कसें कळेना,
प्रपंचिकांनीं घेउनि कानीं, हलकी वाणी, आणुनि ध्यानीं, आश्रय नसुनि,
सोडुनि द्यावें दाणापाणी, रीति नव्हे ही, नीति नव्हे ही, जीत नव्हेही, जि-

द्द नव्हे ही, व्यर्थ तूमचा अनर्थ होईल, समर्थ यांचें कायहो जाइल, कळलें जैसें कथिलें आपणां, येईल तैसें किजे स्वमना' अति नम्रत्वें वदलों त्यांना, "जगन्नाथ जगचालक, पालक, मालक जगिं या तो असतांना, उणें कायहो आसेच अन्ना, जन्माआधीं पाणी दाणा, मजसाठीं निर्माण करूनी, पूर्ण भरोनी, खजान्यांत श्रीनाथ ठेविला, उपेक्षिना तो कधि भजकांना, त्याच्या चरणां, शरण सदा जरि, तरी कृपा करी त्याचि नरावरि, कर्मा करीना त्यासिं कधिं हरी, " उपदेशीं असी सुधी परोपरी, भगवंता तूं हीच वाट धरि, देइल चरणीं रोटी, या उदरासाठीं, हांजी हांजी लागे पाठीं ॥ ५ ॥

**समाप्त.**

सं·काव्य ११८

# अभिप्राय.

हरिभक्तिपरायण रा. रा. **लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**, बी. ए. यांचा अभिप्रायः—

पैठणचे प्रख्यात ज्योतिषी व बहुगुणी भगवंतराव तोडेवाले यांनीं स्वतंत्रपणें रचलेला कटिबंध त्यांच्याच मुखानें श्रवण करून मला फार आनंद वाटला. रा. तोडेवाले ज्योतिषी आहेत, नखानें मोठीं चातुर्याचीं कामें करितात, आणि त्यांच्या ठिकाणीं कवित्वगुणही चांगल्या प्रकारें वसत आहे. प्रस्तुत कटिबंध मोठ्या आवेशयुक्त व समर्पक भाषेनें नटविला आहे. सेवाधर्माचा वीट येऊन स्वतंत्र धंद्याची गोडी आपणास कां लागली, हें रा. तोडेवाले यांनीं त्यांत सांगितलें आहे. प्रत्येक सेवाधर्मानुभव घेणाऱ्या रसिकास हा कटिबंध आवडेल अशी योग्य रचना झाली आहे. कटिबंधाचें मुख्य जीवन जी अनुप्रासांच्या सांखळीची योजना ती चांगली साधली आहे. कटिबंध लोकप्रिय होईल अशी आशा आहे.

पुणें येथील प्रसिद्ध **डाक्तर गणेश कृष्ण गर्दे**, एल्. एम्. ॲंड. एस्. यांचा अभिप्रायः—

रा. भगवंत गोविंद तोडेवाले पैठणकर ज्योतिषी यांनीं आपल्या नोकरीच्या राजीनाम्यासंबंधानें केलेला कटिबंध त्यांनीं मला समग्र वाचून दाखविला. भाषा कटिबंधाला शोभणारी आहे. व सदर लहानशा ग्रंथावरून ग्रंथकर्त्यांत कवित्वाचें बीज आहे असें मी लिहून देतों. अनुप्रास चांगले साधले आहेत. वर्णन फार आवेशाचें आहे.

रा. रा. **नारायण नरसिंह शास्त्री साठे**, म्यानेजर, मनोहर प्रेस, पुणें, यांचा अभिप्रायः—

देशबंधु जोतिर्विद भगवंत गोविंद तोडेवाले यांनीं स्वस्थितिदर्शक " नोकरीचा राजीनामा " यावर केलेला कटाव मी समग्र

वाचून पाहिला. त्यात नोकरांचे कष्ट, कामदारांची अरेरावी, आप्त ची शिकवणी, गुलामगिरीचा तिटकारा व ईश्वरावरील भरंसा इतक्या गोष्टी मोठ्या चटकदार रीतीनें वर्णिल्या आहेत. कवितेंत सुंदर पदलालित्य असून एक प्रकारचा प्रसाद आहे. ज्यो. भगवंतरावजी मोठे गुणी, रसिक व देशाभिमानी गृहस्थ असून गुलामगिरीचा त्यांस केवढा तिरस्कार आहे, हें त्यांनीं आपल्या उदाहरणानेंच दाखवून दिलें आहे. हें मर्म इतर देशबंधूच्या हृदयांत बाणेल तो सुदिन समजला पाहिजे.

आयुर्वेद महोपाध्याय श्रीयुत वे. शा. सं. **शंकर दाजी शास्त्री पदे**, नासिक, पंचवटी, यांचा अभिप्रायः—

पैठणचे प्रख्यात ज्योतिषी ज्यो. विं. भगवंत गोविंद तोडेवाले यांनीं हा कटाव, कटावाच्या दृष्टीनें जसा चांगला केला आहे, तशीच यांची जी स्थिति यांत वर्णन केली आहे तीही परिणामीं चांगली सुखकारक झाली आहे. स्वतंत्र प्रतिभेचीं माणसें, जीं अशीं पुष्कळ ठिकाणीं गुंतून राहिलीं आहेत, त्यांना हा कटाव ह्मणजे एक मार्गदर्शकच आहे, असें मला वाटतें. सेवाधर्मपरायण लोकांनीं हा कटाव वाचणें जसें हितावह आहे, तसेंच स्वतंत्र माणसांना हा उत्तेजनार्हही आहे.

---

पुणें येथें शि. म. प. यांच्या ' मनोहर ' प्रेसमध्यें छापिला.

२५८

श्रीसाधु

# बाळकृष्ण महाराजांचें चरित्र.

महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें श्री अक्कलकोटचे महाराज, श्रीका बुवा महाराज, देव मामलेदार महाराज, श्री नृसिंह सरस्वती मह राज वगैरे साधु पुरुष होऊन गेले यांचेच तोडीचे औरंगाबादेस वरील साधुश्रेष्ठ होऊन गेले. त्यांचें हें अल्प चरित्र आहे. याची किंमत पूर्वी एक रुपया होती, परंतु हल्ली ४ आणे ठेविली आहे. ट. व प्या. खर्च एक आणा पडेल.

———:o:———

# चेहऱ्यावरून कुंडली मांडणें.

हें पुस्तक आह्मी मोठ्या परिश्रमानें तयार केलें आहे. यांत चेहऱ्यावरून कुंडली मांडण्याचे आडाखे काय असावेत, याचें विवेचन केलें असून चेहऱ्यावरून कुंडली मांडण्याच्या विद्येचा ' ओनाम ' यांत दर्शविला आहे. याचे दुसरे भाग यथानुक्रम तयार व्हावयाचे आहेत. या पहिल्या भागाची किंमत चार आणे ठेविली आहे. ट. व प्या. खर्च एक आणा पडेल.

# ग्रहविहारभुवन.

या नांवाची संस्था आह्मी पैठण येथें ज्योतिषशास्त्राच्या परिशीलनासाठीं काढिली आहे. या संस्थेंत ज्योतिषशास्त्रावरील लहान मोठे १७५ ग्रंथ संपादन करून ठेविले आहेत. येथें ज्योतिःशास्त्रावरील व इतर व्याख्यानें वगैरे होत असतात व सार्वजनिक पाहुण्यांचा सत्कार केला जातो. कोणाही उदार गृहस्थांनीं या संस्थेस पुस्तकाची किंवा नगदीची अथवा अन्य प्रकारची मदत केल्यास साभार स्वीकारली जाते.

**भगवंत गोविंद तोडेवाले,**

चालक, ग्रहविहारभुवन, पैठण.

REFBK-0000278
REFBK-0000278